# सट्टा बाजारात तुतारीला पसंती

## कमळाला सर्वांत कमी तर घड्याळचा दुसरा नंबर

## पाहुया २१ तारखेला कोण होतोय बीडचा बाजीगर

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# तुरुंगात जाईन, पण भाजपात नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांसमोरच विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल



मुंबई ,(दिव्य न्युज):- नागपुरात विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात विविध मुद्द्यांवरून विरोधक आणि सत्ताधारी आमनेसामने येणारच आहेत. कारण अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. अधिवेशनाच्या कामकाजाचे दिवस कमी का? असा प्रश्न उपस्थित करत काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांनी सरकारवर हल्लाबोल केला. ज्यानंतर आता एका मराठी कार्यक्रमात बोलताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच भाजपावर जोरदार हल्ला चढवला आहे. तुरुंगात जाईल, तिथे वर्षभर राहिल पण भाजपात जाणार नाही, असे वडेट्टीवार यांनी स्पष्टपणे फडणवीसांसमोर म्हटले आहे.

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

एका कार्यक्रमात आज काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी रोखठोक मुलाखत दिली. यावेळी त्यांना भाजपात जाणार की नाही? याबाबत प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी याबाबत स्पष्टपणे उत्तर देताना म्हटले की, मी तुरुंगामध्ये जाण्यासाठी तयार आहे. पण आता सांगतो ते काय करतील? वर्षभर तुरुंगामध्ये ठेवतील. कुठले तरी आरोप होतील. आता सर्वजनिक जीवनात आणि राजकारणात आरोप होत असतात. त्यामुळे आपण तुरुंगातमध्ये जाऊ, तशी तयारी देखील आहे. पण माझे नाव पुन्हा पक्ष बदलण्याच्या यादीत येऊ नये असे माझे मत आहे. तुरुंगामध्ये जाईन, वर्षभर जेलमध्ये राहील, पण भाजपात जाणार नाही. आम्हाला विरोधात तर लढू तर द्या, सर्वज भाजपात गेल्यानंतर लढणार कोण? असा खोचक सवालही यावेळी वडेट्टीवारांनी उपस्थित करत ते काँग्रेस सोडून कुठेही जाणार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे.

तसेच, काँग्रेस आणि महाविकास आघाडीने भाजपाकडून काय शिकले पाहिजे? असा प्रश्नही त्यांना या मुलाखतीवेळी विचारण्यात आला. ज्याबाबत वडेट्टीवार म्हणाले की, आम्ही त्यांच्याकडून दोनच गोष्टी शिकल्या पाहिजेत. त्या म्हणजे आम्ही आमच्या भाषणाचे मुद्दे बदलले पाहिजेत. हिंदू-मुस्लिम करत राहिले पाहिजे. आम्ही भारत-पाकिस्तान करत राहिले पाहिजे. तसेच आणखी एक मुद्दा की आम्ही मशिद-मंदिराबाबत आमचे भाषण सुरू असले पाहिजे, पण ते मंदिराच्या बाजूने. तरच आम्हाला यातून पुढे जाण्यासाठी स्कोप आहे, असा जहरी टोला काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपाला लगावला आहे. त्यामुळे आता भाजपा नेतेमंडळी वडेट्टीवार यांना काय प्रत्युत्तर देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# राजुरी नवगण गटातील घरकुल हप्ता वितरण दोन महिन्यांपासून बंद

## स्पर्श प्रणाली तात्काळ कार्यान्वित करावी-सतिष शेळके



बीड,(दिव्य न्युज):- राजुरी नवगण जिल्हा परिषद गटातील घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे हप्ते मागील दोन महिन्यांपासून वितरीत झालेले नाहीत. स्पर्श प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे हप्त्यांचे वितरण पूर्णपणे ठप्प झाल्याने कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर व ऊसतोड कामगार या वर्गातील अनेक कुटुंबे अडचणीत सापडली आहेत.

हप्ते न मिळाल्यामुळे घरबांधणीची कामे थांबली असून साहित्य दरवाढ, आर्थिक ताण आणि अपूर्ण बांधकाम अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रशासनाच्या स्पर्श प्रणालीतील बिघाडामुळे ▶▶ पान २ वर

# कुत्र्यांच्या कळपाने केलेल्या हल्ल्यात चिमुकली जखमी

अंबाजोगाई ,(दिव्य न्युज):- येथील क्रांती नगर परिसरात राहत आलेल्या ८ वर्षीय चिमुकलीवर या परिसरात मोकाट फिरणाऱ्या १० ते १२ कुत्र्यांच्या कळपाने हल्ला चढवला. तिचा सर्वांनी चावा घेऊन तिला जखमी केले. हा प्रकार रविवारी दुपारी घडला. त्या जखमी मुलीवर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



क्रांती नगर परिसरातील राबिया रहिम शेख (वय-८) ही मुलगी आपल्या मैत्रिणीकडे गेली होती. रस्त्याने ती घरी परत जात असताना त्या परिसरात मोकाट फिरणाऱ्या १० ते १२ कुत्र्यांच्या कळपाने तिच्यावर हल्ला केला. तिच्या शरीरावर कुत्रांनी अनेक ठिकाणी चावा घेऊन तिला जखमी केले. परिसरात असलेल्या नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार येताच त्यांनी कुत्रे पान २ वर

# हिंस्त्र प्राण्याने पाडला सात शेळ्यांचा फडशा

## डोंगर पिंपळा परिसरात दहशत



अंबाजोगाई ,(दिव्य न्युज):- अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा शिवारात एका अज्ञात आणि हिंस्त्र श्वापदाने मोठा हाहाकार माजवला आहे. रविवारी रात्री या श्वापदाने एका शेतकऱ्याच्या गोठ्यात घुसून तब्बल सात शेळ्यांना ठार केले. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे ▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंढे यांना निलंबित करा

## भाजपाचे आमदार हिवाळी अधिवेशनात करणार मागणी



मुंबई,(दिव्य न्युज):- राज्यातील ख्यातनाम आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या विरोधात हिवाळी अधिवेशनात भाजप आमदार विशेष लक्षवेधी सूचना मांडून त्यांना निलंबित करण्याची मागणी करणार असल्याची माहिती आहे. तुकाराम मुंढे नागपुरात महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी कोणतेही अधिकार नसताना आणि शासनाकडून त्यांची स्मार्ट सिटी प्रकल्पचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नेमणूक नसतानाही त्यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पाचा प्रभार नियमबाह्य पद्धतीने आपल्याकडे घेतला होता, असा आरोप भाजपाचा आहे. त्यामुळे तुकाराम मुंढे यांना निलंबित करण्याची मागणी भाजपा आमदार विधिमंडळ अधिवेशनात करणार आहेत.


१) स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना त्यांनी काही मर्जीतल्या कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांचे नियमबाह्य पेमेंट केले होते. २) तसेच काही महिला अधिकाऱ्यांना दमदाटी केली होती. ३) दोन्ही प्रकरणांचे एफआयआर तेव्हा पोलिसांकडे दाखल झाले होते. मात्र उद्धव ठाकरे आणि महाविकास ▶▶ पान २ वर

# घोटाळेबाज अधिकाऱ्यांना जेलची हवा खावीच लागणार

## शिक्षक भरती घोटाळ्यात दोन अधिकाऱ्यांना घरी लावल्यानंतर एसआयटीच्या पाठीशी सरकार उभे राहिले

### गुन्हे दाखल होणार असल्यामुळे लवकरच प्रकरणात गुन्हे शाखेची होणार एन्ट्री

बीड, (दिव्य न्यूज): जिल्ह्यातील घोटाळेबाज अधिकाऱ्यांना जेलची हवाच खावी लागणार आहे. कारण शिक्षक भरती घोटाळ्यात शिक्षणाधिकारी भगवान फुल्लारी आणि नागनाथ शिंदे या दोन अधिकाऱ्यांना घरी लावल्यानंतर सरकार एसआयटीच्या पाठीशी ताकतीने उभे राहिले आहे. त्याअनुषंगानेच तपासासाठी एसआयटीला आणखी चार महिण्यांचा वेळ वाढवून दिला आहे. लवकरच नागपूर, नाशिकप्रमाणेच बीडमध्येही ▶▶ पान २ वर



पुणे : साऊथ आंध्रा रोड लाईन्सचे संचालक हाजी शेख अखिल यांचे जेष्ठ चि.आश्रफ शेख यांचा साखरपुड्याच्या कार्यक्रम काल पुणे येथील गार्डन गेट रेस्टॉरंट येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी नवरदेव आश्रफ शेख यांना शुभेच्छा देतांना संपादक मोहंमद अबूबकर..



पुणे : प्रसिध्द समाजसेवक तथा संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरेंसचे हाजी जुबेर मेमन यांच्या पुणे कार्यालयास भेट दिली असता त्यांच्याकडून टोपी,शाल आणि त्यांच्यावर आधारित पुस्तक भेट देवून स्वागत केले.

# बीड शहरात बिनधास्त फिरत आहेत नगर पालिकेच्या घंटागाड्या अन् कचरा टॅम्पो

## यापुर्वीच्या अन् आत्ताच्या सर्व घंटागाड्यांची पालिकेने पासिंगच केली नाही

### उपप्रादेशिक परिवहन विभाग, पोलिसांचे होतेय दुर्लक्ष, जवळपास वर्षेभरापासून वाहनांवर नाहीत क्रमांक

**बीड, (दिव्य न्युज):- शहरात स्वच्छतेसाठी तैनात करण्यात आलेल्या नगरपालिकेच्या घंटागाड्या गेल्या तीन ते चार महिन्यांपासून चक्क विनाक्रमांक धावत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सर्वसामान्यांच्या वाहनावर नंबरप्लेट नसेल तर तत्काळ कारवाई करणारे पोलिस प्रशासन आणि वाहतूक विभाग नगरपालिकेच्या या वाहनांकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करू लागले आहेत.**

शहरातील कचऱ्याची गंभीर समस्या सोडवण्यासाठी नगरपालिकेने नवीन वाहनांची खरेदी केली होती. १७ सप्टेंबर २०२५ रोजी पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या घंटागाड्यांचे लोकार्पण झाले. मात्र, तेव्हापासून आजतागायत शहरातील अनेक वॉर्डामध्ये फिरणाऱ्या घंटागाड्यांवर नंबरप्लेट नसल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे कचरा उचलणाऱ्या दोन टेम्पोंवरही क्रमांक नाहीत. नवीन वाहन खरेदीनंतर तत्काळ पासिंग होणे आवश्यक असताना, ही वाहने गेले चार महिने अशीच कशी धावत आहेत, हा प्रश्न अनुत्तरित आहे. दरम्यान, घंटागाड्या केवळ सकाळीच कचरा उचलण्यासाठी येत नाहीत तर दिवसभर सुभाष रोडसह इतर भागांमध्ये कचरा संकलन करतात.








### अपघात घडला, तर जबाबदार कोण?

या प्रकारामुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जर एखाद्या विनाक्रमांकाच्या घंटागाडीने अपघात केला आणि चालकाने पळ काढला, तर नेमके कोणत्या गाडीने धडक दिली, हे ओळखायचे कसे? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याशिवाय, कोणत्या गाडीत किती डिझेल भरले जात आहे, याचा प्रशासकीय ताळमेळ क्रमांकाशिवाय कसा ठेवला जातो, यावरही संशय व्यक्त केला जात आहे.

### मुख्याधिकारी म्हणाले, तात्पुरते नंबर लावण्याची सूचना देवू....

१. बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे म्हणाले की, शहरात स्वच्छतेसाठी ३५ घंटागाड्या, ३ टेम्पो, १ कॉम्पॅक्टर आणि २ जेसीबी अशी मोठी ऑर्डर देण्यात आली होती. १७सप्टेंबरपासून या गाड्या टप्प्याटप्प्याने ताफ्यात दाखल झाल्या.

२. १० नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांची आरटीओ पासिंग प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र, संबंधित विभागाकडून हाय-सिक्युरिटी नंबरप्लेट्स मिळण्यास विलंब होत आहे. शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.

३. केवळ नंबरप्लेट नाही म्हणून या गाड्या उभ्या ठेवल्या असत्या, तर शहरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असते. सध्या १५-१६ गाड्यांचे नंबर आले आहेत आणि २३ गाड्यांचे आरसी बुक प्राप्त झाले आहे. जसे नंबर येत आहेत, तसे ते बसवले जात आहेत. नंबरप्लेट येईपर्यंत गाड्यांवर पुढ्याचे 'तात्पुरते नंबर' लावण्याची सूचना केली जाईल, असे मुख्याधिकारी फडसे म्हणाले.

पान ४ वरून

## पारवे ताई निवडून

परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण करणे कसे आवश्यक आहे हे पाहिले असेलच. त्यांनी एका वृत्तपत्राच्या संपादकाच्या जबाबदारीसह नगराध्यक्ष पदासाठी त्यांच्या सासूमाई असलेल्या पालवे ताई यांच्यासाठी निवडणूकीत मोठे परिश्रम घेतल्याने मतमोजणीनंतर बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी त्या निवडून आल्या तर मुजीब भाई यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण होईल का याची उत्सुकता बीड शहरवासीयांना या निमित्ताने लागली असल्याचे ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी सातत्याने संघर्षरत असलेले मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

## बीडच्या माता-बाल

रखडलेल्या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनाचे उंबरठे झिजवले. निधी न मिळाल्यास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या दालनासमोर 'पालकमंत्री अजितदादा के नाम पे देदे बाबा असे लक्षवेधी 'भीक मागो आंदोलन' करण्याचा गंभीर इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला होता. या आक्रमक भूमिकेची दखल घेत प्रशासनाने वेगाने हालचाली केल्या आणि जिल्हा नियोजन समितीतून तातडीने १ कोटी ७३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

## वडवणीत

पसरू नये म्हणून विशेष काळजी घेणे आवश्यक असते. मृतदेहावर अंत्यसंस्कार लवकर करायचे असल्यास, स्वर्गरथ पोहोचता येते, अन्यथा शोधाशोध करण्यात वेळ जातो. काहीवेळा, मृतदेह एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा परदेशात नेताना शववाहिनी गरज पडते. आपत्कालीन परिस्थितीत किंवा दुर्गम भागातून मृतदेह आणण्यासाठी आवश्यकता पडते. थोडक्यात, शववाहिनीव स्वर्गरथही एक सामाजिक गरज आहे, जी मृतदेहाची वाहतूक सुलभ, सुरक्षित आणि सन्मानजनक बनवते.

## धारावती तांडा

यशवंत प्रेमदास पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चार अनोळखी आरोपींवर इछड २०२३ कलम ३०९(ब), २८१, १२६(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक मजहर सय्यद हे तपास करीत आहेत. परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक मजहर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून आरोपींचा तपासासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

# पोराने बापाच्या डोक्यात घातली कुऱ्हाड, सुदैवाने ती दांड्यातून निखळली अन् बापाचा जीव वाचला

केज ,(दिव्य न्युज):- बापाने दारू का पिला असे विचारताच?, पोटच्या पोराने रागाने आपल्या बापाला कुऱ्हाडीने डाव्या हातावर वार केला. मात्र दुसरा वार डोक्यात करीत असताना सुदैवाने कुऱ्हाड दांड्यातून निखळून खाली पडल्याने बापाचा जीव वाचला.

केज पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या धारूर तालुक्यातील गांजपूर येथील भारत तुकाराम धोंगडे यांचा मुलगा नितीन घोंगडे याला दारु पिण्याची सवय आहे. दि.५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७:३० वा.चे. सुमारास तो दारु पिऊन घरी आला. म्हणून त्याचे वडील भारत धोंगडे यांनी तु दारु पिऊन का आलास? असे विचारले म्हणून त्याला राग आला आणि नितीन धोंगडे यांनी त्याच्या वडिलांना शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने डाव्या हातावर वार करुन जखमी केले. नितीन धोंगडे हा त्याच्या बापाच्या डोक्यात कुऱ्हाडीचा दुसरा वार घालीत असताना अचानक दांड्यामधून कुऱ्हाड निघून पडली आणि सुदैवाने त्यांच्या डोक्यात कुऱ्हाडी ऐवजी दांडा लागल्याने पुढील अनर्थ टळला. मात्र दांडा डोक्यात लागल्याने त्यांचे डोके फुटले आणि ते खाली पडले.

भारत धोंगडे यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र युसुफवडगाव येथे प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचार करण्यात आले. भारत धोंगडे यांच्या तक्रारीवरून नितीन धोंगडे याच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गु. र. नं. ३०५/२०२५ भा. न्या. सं. ११५(३), ११८(१), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल केशव खाडे हे तपास करीत आहेत.

पान १ वरून

## राजुरी नवगण गटातील

जनहिताचे काम अडकून पडणे ही गंभीर बाब असल्याचे स्थानिकांनी नमूद केले आहे. या परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन स्पर्श प्रणाली सुरळीत करून प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश शेळके पाटील यांच्या वतीने मा.ना.उपमुख्यमंत्री श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब व मा.ना.राज्यमंत्री श्री.योगेशजी कदम साहेब तसेच संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. स्थानिक लाभार्थ्यांची अडचण दूर करण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## कुत्र्यांच्या कळपाने

हुसकावून लावले. व त्या जखमी मुलीला उपचारासाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात त्या मुलीवर उपचार सुरू आहेत. त्या मुलीची प्रकृती स्थिर असल्याचे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले.

शहरात यापूर्वीही मोकाट कुत्र्यांच्या कळपाने नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना चौसाळकर कॉलनी,माळी नगर, भट्टगल्ली, रविवार पेठ अश्या अनेक ठिकाणी घडलेल्या आहेत. मात्र असे प्रकार वारंवार होऊनही प्रशासनाला गांभीर्य नाही.अंबाजोगाई शहरात प्रत्येक गल्ली बोळात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी वारंवार होत असूनही नगर परिषद प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## तुकाराम मुंढे

आघाडीच्या सरकारच्या दबावात तुकाराम मुंडे यांच्या विरोधात आवश्यक कारवाई होऊ शकली नव्हती. आता ते दोन्ही जुने प्रकरण नव्याने पुन्हा समोर आणून भाजप आमदार तुकाराम मुंडे यांच्या निलंबनाची मागणी करणार असल्याची माहिती आहे.

राज्यातील धडाडीचे आयएएस अधिकारी अशी तुकाराम मुंढेंची ओळख आहे. प्रशासनात काम करताना नियमांवर बोट ठेवून काम करणारे तुकाराम मुंढे हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांना पंसत नसल्याचं दिसून येतंय. राजकीय नेतृत्वाला, मंत्र्यांना आपल्या मनाप्रमाणे नियमबाह्य गोष्टी करण्यामध्ये तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी अडथळे ठरतात. त्यामुळे नियमानुसार सर्वसाधारणपणे तीन वर्षात बदली होणे अपेक्षित असताना तुकाराम मुंढे मात्र सरासरी एक वर्षेच काम करताना दिसून येतात. तुकाराम मुंढे यांची अलीकडेच (ऑगस्ट २०२५ मध्ये) पुन्हा एकदा बदली झाली असून, त्यांची नियुक्ती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे हे २००५ बॅचचे अधिकारी असून गेल्या २० वर्षांच्या कालावधीत त्यांची ही २४ वी बदली ठरली आहे. प्रशासनात काम करताना हा एक वेगळ्या प्रकारे विक्रमच असल्याचं दिसून येतंय.

आजपासून (८ नोव्हेंबर) हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. मात्र यंदा प्रथमच विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहाचं कामकाज विरोधी पक्षनेत्यांशिवाय चालणार आहे. आज पहिल्या दिवशी पुरवणी मागण्या मांडल्या जातील. शासकीय कामकाज होईल. त्यानंतर शोकप्रस्ताव मांडला जाईल. त्यानंतर कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले जाईल. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे या निवडणुकांचा प्रभाव पुरवणी मागण्यांवरती पडणार का?, पुरवणी मागण्यासंदर्भात काही नवीन घोषणा होते का? हे पाहणं महत्वाचं राहील.

## हिंस्त्र प्राण्याने पाडला

१ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून, परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे.

डोंगर पिंपळा येथील शेतकरी बळीराम बाबुराव केंद्रे हे ज्या शेतात वहीत करतात, तिथेच त्यांनी शेळीपालनासाठी शेड उभारले आहे. केंद्रे यांच्याकडे सहा मोठ्या शेळ्या आणि एक लहान पिल्लू असे एकूण सात पशुधन होते. रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता त्यांनी शेळ्यांना चारापाणी केले आणि ते झोपण्यासाठी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात हिंस्त्र श्वापदाने त्यांच्या शेडवर हल्ला केला. या हिंस्त्र श्वापदाने गोठ्याच्या संरक्षणासाठी लावलेल्या सहा फूट उंचीच्या जाळीवरून सहज उडी मारून आत प्रवेश केला. आत शिरताच त्याने सातही शेळ्यांना ठार मारून त्यांचा फडशा पाडला. सोमवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर बळीराम केंद्रे यांना धक्का बसला. यामध्ये त्यांचे सुमारे १ लाखांहून अधिक रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने पंचनामा केला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रतन तळेकर आणि डॉ. अभिषेक अबुज यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृत शेळ्यांचे शवविच्छेदन केले. या घटनेमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठी भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने तातडीने या हिंस्त्र श्वापदाचा शोध घेऊन बंदोबस्त करावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डोंगर पिंपळा येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## घोटाळेबाज अधिकाऱ्यांना

अटकेची कारवाई केली जाणार आहे. सरकारकडून सुरू असलेल्या याच हालचालीमुळे जिल्ह्यातील बोगस साडे सहाशे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणून गेले आहेत. विशेषतः गुन्हे दाखल होणार असल्यामुळे आगामी काळात या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेचीएन्ट्री होणार आहे.

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बोगसपणे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे. यातून शेकडो कोटींचा अपहार झालेला आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांनी आवाज उठविल्यामुळे सरकारने चौकशीसाठी एसआयटी नेमली. त्यावर या एसआयटीने यामध्ये बारकाईने लक्ष देवून तपास केला, अगदी पहिल्याच टप्प्यात एसआयटीने याप्रकरणात कुठे ना कुठे दोषी असल्याचा ठपका ठेवून बीडचे शिक्षणाधिकारी भगवान फुल्लारी आणि नागनाथ शिंदेंना सेवेतून तडकाफडकी निलंबित केले. आता हे प्रकरण एवढ्यावरच थांबणार नाही. कारण या प्रकरणाचा तपास अत्यंत बारकाईने केला जात आहे. त्यामुळेचं या प्रकरणी घोटाळेबाज अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जेलमध्येच जावे लागणार आहे. कारण सरकारने एसआयटीला आणखी चार महिण्यांचा वेळ वाढवून दिला आहे. या समितीचा कालावधी सात नोव्हेंबर रोजी संपला होता. मात्र या प्रकरणाची व्याप्ती पाहता चौकशी पथकास पुढील चार महिण्यांची म्हणजेच आठ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळेच आता जिल्ह्यातील घोटाळेबाजांबरोबरच साडे सहाशे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत